'Research Journey' International Multidisciplinary E- Research Journal
ISSN :2348-7143 (Online)
मराठी साहित्य संशोधन विशेषांक
Vol. 2 Issue. 3
July-Sept.- 2015

# १९ व्या शतकातील निवडक स्त्री सुधारकांचा स्त्रीविषयक दृष्टिकोन

**डॉ. म. सु. पगारे**
संशोधन मार्गदर्शक
प्रोफेसर व मराठी विभागप्रमुख
भाषा अभ्यास प्रशाळा व संशोधन केंद्र
उत्तर महाराष्ट्र, विद्यापीठ, जळगाव.
महाराष्ट्र, भारत

**माधुरी मंगेश बुधकर**
संशोधक विद्यार्थी
मराठी विभाग,
भाषा अभ्यास प्रशाळा व संशोधन केंद्र
उत्तर महाराष्ट्र, विद्यापीठ, जळगाव.
महाराष्ट्र, भारत

*सर्वच स्त्रीसुधारकांनी त्याकाळात रुढीपरंपरेच्या गर्तेत अडकलेल्या स्त्रीला आपल्या कार्याच्या आधारे माणूस म्हणून जगण्याचा अधिकार मिळवून दिला म्हणूनच ती स्वाभिमाने उभी राहू शकली. शिकली, सुशिक्षित झाली याचे सर्व श्रेय या सुधारकांना जाते. १९व्या शतकात अनेक समाजसुधारकांनी समाजातील स्त्रीची अवनिती पाहून तिला मुक्त करण्यासाठी, प्रामुख्याने तिला तिचे हक्क मिळवून देण्यासाठी अतोनात प्रयत्न केले. बाळशास्त्री जांभेकरांनी आपल्या 'दर्पण', लोकहितवादींनी 'शतपत्रे' तर गोपाळ गणेश आगरकरांनी 'सुधारक' या वर्तमानपत्रातून आवाज उठविला. राजाराम मोहन रॉय, न्या. महादेव गोविंद रानडे, स्वामी दयानंद सरस्वती, ईश्वरचंद्र विद्यासागर, महात्मा जोतिबा फुले, महर्षि धोंडो केशव कर्वे, महर्षि विठ्ठल रामजी शिंदे, राजर्षि शाहू महाराज इत्यादी सुधारकांनी आपल्या कार्यातून व कृतीतून स्त्रियांवर होत असलेल्या अन्यायाविरुध्द लढा दिला व तिला तिला आपले हक्क मिळवून दिले. यात सिंहाचा वाटा ज्योतिबा फुलेंचा आहे.*

आपल्या भारतभूमीवर अनेक परकियांनी आक्रमणे केली जवळजवळ ३०० वर्षे आपल्यावर परकियांनीन राज्य केले. महाराष्ट्राची अवस्था तर आणखी बिकट होती. अंधश्रध्दा, रुढी, परंपरांनी तो गांजलेला होता. त्यात सुलतान, मोगल, निजाम, इंग्रज इत्यादींच्या वर्चस्वाखाली आपल्याला राहावे लागले. यामुळे दैनावस्था आपल्याला प्राप्त झाली होती. सुलतान, मोगलांनी, तर धुडगुसच घातला. विशेषत: स्त्रियांवरील अन्याय अधिक वाढले. नगण्यावस्था स्त्रीला प्राप्त झाली. यातून काहीशी सुटका शिवकाळात झालेली आढळते. शिवाजी महाराजांचा स्त्री विषयक दृष्टिकोन निकोप असल्याने स्त्रीला शिवकाळात जो मनसन्मान मिळाला तो तेवढयापुरताच. पुढे पेशवेकाळात स्त्रियांच्या अवस्थेला अवकळा प्राप्त झाली. स्त्रियांच्या या स्थितीतून सुटका करण्याचे कार्य १९व्या शतकात काही समाजसुधारकांनी केली.

त्याकाळी समाजात बालविवाह, सतीप्रथा, केशवपनाची प्रथा, स्त्रियांवर होणारे अतोनात अन्याय यांचे प्रमाण वाढलेले होते. या विरोधात प्रथमत: समाज जागृती बाळशास्त्री जांभेकरांनी आपल्या 'दर्पण' या वृत्तपत्रातून केली एवढेच नव्हे तर प्रा. नरेंद्र भारवाडे म्हणतात, ''बाळशास्त्री जांभेकरांनी १८४० मध्ये गंगाधरशास्त्री फडके यांच्याकडून विधवाविवाहास अनुकूल असे पुस्तक लिहून घेतले होते.''[१] अशाप्रकारे विविध विचारवंतांच्या विचारांतून व वृत्तपत्रांच्या आधारे त्यांनी स्त्रियांवरील होणाऱ्या अन्यायाला वाचा फोडली. याच काळात गोपाळ हरी देशमुख म्हणजेच लोकहितवादी यांनी आपल्या 'शतपत्रा'तून स्त्रीशिक्षणाचा पुरस्कार केला. १८४८ ते १८५० या दोन वर्षात त्यांची 'शतपत्रे' प्रभाकर या मासिकातून प्रसिध्द झाली. 'पुरुषांना पुनर्विवाहाची परवानगी असेल तर स्त्रियांनाही पुनर्विवाहाची परवानगी असली पाहिजे असा परखड विचार लोकहितवादी म्हणजे गोपाळ हरी देशमुखांनी मांडला. त्याकाळातील केशवपन करण्याच्या प्रथेवर त्यानी कडाडून टीका केली. पत्नीपासून विभक्त व्हायचे असेल म्हणजे काडीमोड घ्यायची असेल तर पती-पत्नीच्या संमतीनेच ती झाली पाहिजे असा नापी विचार त्यांनी मांडला. पतीपासून पत्नीचा छळ होत असेल तर पतीपासून विभक्त होण्याचा अधिकार तिला असला पाहिजे आणि अशाप्रकारच्या प्रकरणात पत्नीला पतीकडून पोटगीही मिळाली पाहिजे असा परखड विचार त्यांनी मांडला. म्हणूनच गोपाळ हरी देशमुखांना स्त्री सुधारणेचे पुरस्कर्ते मानले पाहिजे.

लोकहितवादी स्त्री शिक्षणाचे व विधवा विवाहाचे पुरस्कर्ते होते. जन्मनिष्ठ उच्च-निचता, स्त्री-पुरुषातील विषमता या गोष्टी नष्ट झाल्या पाहिजेत, स्त्रीला प्रतिष्ठा प्राप्त झाली पाहिजे. सतीची चाल व बालविवाह या गोष्टी बंद झाल्या पाहिजेत,

विधवा विवाहाला संमती मिळाली पाहिजे, स्त्रियांना शिक्षण देऊन त्यांचे अज्ञान दूर केले पाहिजे इत्यादी विचार आपल्या लेखणीतून अतिशय निर्भयपणे त्यांनी मांडले.

याच काळात स्त्री पुरुषांच्या समान हक्काचे पुरस्कर्ते न्या. महादेव गोविंद रानडे यांचेही कार्य वाखाणण्याजोगे आहे. आपला पुरुषार्थ केवळ स्त्रियांशी वागतांनाच दाखवणाऱ्या पुरुषांवर त्यांनी जोरदार टीका केली. त्याकाळात गाजलेल्या रखमाबाई विरुध्द दादाजी या खटल्यात त्यांची महत्त्वाची भूमिका होती. याशिवाय मुलामुलींच्या विवाहाचे वय हे कायदयाने ठरवले पाहिजे या मताचे ते होते. त्याचप्रमाणे वृध्दांनी कुमारिकांशी विवाह करू नये अशी आग्रहाची मागणी त्यांनी केली. कुमारिकांना, स्त्रीयांना समाजातील जाचक प्रथांपासून मुक्तता देण्यासाठी अतोनात प्रयत्न केले.

न्यायमूर्ती हे चांगले वक्ते, मार्मिक लेखक, अलौकिक बुध्दिमान, विद्याव्यासंगी, सरळ मनाचे व शांत स्वभावाचे होते. न्या. महादेवजी राजडेंनी पुण्यात जेव्हा पाऊल ठेवले तेव्हा ''महाराष्ट्र देश म्हणजे त्यावेळी एक थंड गोळा होऊन पडला होता. या थंड गोळयात कोणत्या तऱ्हेने ऊब दिली असता तो पुन्हा सजीव होईल व हातपाय हलवू लागेल, याचा रात्रंदिवस एकसारखा विचार करुन अनेक दिशांनी, अनेक उपायांनी, अनेक रीतींनी त्यास पुन्हा सजीव करण्याचे दुर्धर काम अंगावर घेऊन, त्याकरिता जिवापाड जर कोणी मेहनत केली असेल तर ती प्रथमत: माधवरावजींनीच केली असे म्हटले पाहिजे; व आमच्या मते हेच त्यांच्या थोरवीचे तसेच असामान्य मोठेपणाचे मुख्य चिन्ह होय''[२] थोडक्यात त्याकाळात सार्वजनिक जीवनातील प्रत्येक क्षेत्रात त्यांनी आपल्या कार्याचा ठसा उमटविला होता हे यामधून दिसून येते.

१८८८ मध्ये 'सुधारक' वर्तमानपत्र ज्यांनी काढले ते गोपाळ गणेश आगरकर. त्यांनीही आपल्या वर्तमानपत्राद्वारे अनिष्ठ चालीरितींवर घणाघाती हल्ला चढविला. प्रामुख्याने बालविवाह पध्दती कायदयाने बंद व्हावी म्हणून अतोनात प्रयत्न केले. स्त्रीच्या मर्जीनुसार तिचा विवाह व्हावा म्हणजेच स्वयंवर पध्दतीचा पुरस्कार त्यांनी केला. समाजात स्त्रीपुरुष समानता असावी याचाही पुरस्कार त्यांनी केला. पुरुषांप्रमाणे स्त्रीयांनाही अधिकार असले पाहिजे. शिक्षणा शिवाय स्त्रियांची बुध्दी वाया जाते त्यामुळे स्त्रियांचे जसे नुकसान होते तसेच समाजाचेही नुकसान होते हे त्यांनी लक्षात आणून दिले. त्याचप्रमाणे कुठल्याही कामाचे बंधन स्त्रियांना नसावे. तसेच पुरुषांनीही स्त्रियांच्या कामात मदत करावी असा सर्वकष समानतेचा विचार त्यांनी मांडला. पतीनिधनानंतर पत्नी सती जाते याविषयी ते असे म्हणत, ''जर पतीप्रेमातीशय होऊन विधवा सती जात असतील तर बायको मेल्यावर पत्नी प्रेमातिशयाने पुरुषाने सती का जाऊ नये. किंवा पत्नी मेल्याबरोबर विधुर म्हणून जगायचे झाल्यास त्याचे डोके न्हाव्याकडून सपाट गुळगुळीत करावे ! त्यास तांबडेबांड परिधान करण्यास द्यावे. त्यास पुनर्विवाहाची बंदी असावी. त्याचे आयुष्य पुर्णपणे घरातील इतर स्त्रियांवर अवलंबून असावे. पोटाची खळगी भरण्याकरिता लाटण्यापोळपाटाचा आश्रय घेणे भाग पाडावे. फुटक्या नशिबाचा, कपाळकरंटा पांढऱ्या पायाचा म्हणून ज्याने त्याने त्याला एकसारखे टोचीत सुटावे. तो घरातून बाहेर पडल्यावर 'अरे बोडका कुठे आला अपशकून झाला अशी सर्वांनी त्याची छी: थू: करावी. तात्पर्य आम्हा पुरुषवर्गाने पक्षपाताने धर्माचे कारण सांगून सर्वांहून प्रिय अशा प्राणाची आहुती घ्यायला स्त्रियांना भाग पाडावे. अथवा विधवा म्हणून संपूर्ण आयुष्य एकटयाने कंठावयास लावणे यामध्ये पुरुषांच्या मतिभ्रष्टतेचे लक्षण दिसून येते.''[३] इतके उघड आणि परखड विचार त्याकाळी आगरकरांनी मांडले जे त्या कर्मठ समाजाला न पटणारे होते. याचा परिणाम असा झाला की त्यांना अर्वाच्य शिव्या देण्यात आल्या. जिवंतपणी त्यांची पुणे शहरातून प्रेतयात्रा त्यांच्या घरावरुन काढण्यात आली. असे असूनही जराही न डगमगता त्यांनी आपले सामाजिक कार्य अविरत चालूच ठेवले असे हे 'सच्चे' स्त्री समाजसुधारक होते हे त्यांच्या कार्यामधून आपल्या प्रत्ययाला येते.

राजाराम मोहन रॉय सारख्या विचारवंतांने तर सतीच्या चालीविरूध्द आंदोलन केले. त्याचबरोबर स्त्रियांवर होणाऱ्या अनेक अन्यायांविरूध्दही त्यांनी आवाज उठविला. त्यांनी विधवा विवाहाचा पुरस्कार केला. मृत पतीच्या मालमत्तेत मुलांसोबत पत्नीलाही वाटा मिळाला पाहिजे असा विचार त्यांनी जातीने मांडला. समाजातील स्त्रियांची गुलामी ही पुरुषी अहंकारामुळेच निर्माण झालेली असून जोपर्यंत स्त्रिया शिक्षण घेऊन सुशिक्षित व सुसंस्कृत होत नाहीत तोपर्यंत ही गुलामगिरी नष्ट होणार नाही. असा स्पष्टविचार त्यांनी अभ्यासपूर्वक मांडला म्हणून राजाराम मोहन रॉय हे पाहिले कृतीशील स्त्रीवादी विचारवंत होते असे म्हणावे लागेल.

याचकाळात स्वामी दयानंद सरस्वती यांचे स्थानही वैशिष्टयपूर्ण मानले जाते. स्वामी दयानंदांचे नाव उच्चारताच त्यांच्या 'आर्यसमाजा'ची आठवण होते. आर्य समाजाची स्थापना १० एप्रिल १८७५ रोजी मुंबईमध्ये गिरगावात झाली. या आर्यसमाजाच्या माध्यमातून धर्मसुधारणेचे आणि समाजसुधारणेचे कार्य त्यांनी केले. त्यांच्या मते, स्त्रियांनी आणि सर्व वर्णजातीयांनी वेदाध्ययन आणि वेदपठन केले पाहिजे असा त्यांचा मनापासून आग्रह होता. एवढेच नव्हे तर मुलांच्या बरोबर मुलींनाही सर्वप्रकारचे अगदी युध्दविद्येपर्यंतचे शिक्षण देण्याचे आवाहन त्यांनी संपूर्ण समाजाला केले. बालविवाह त्यांना अमान्य होता आणि प्रौढविवाहाचे ते पुरस्कर्ते होते. स्त्रीपुरूषांच्या लग्नाच्या वयाविषयीही त्यांचा स्वत:चा असा स्वतंत्र दृष्टिकोन होता. सोळाव्या वर्षापासून चोविसाव्या वर्षापर्यंत स्त्रीचे आणि पंचविसाव्या वर्षापासून चाळीसाव्या वर्षापर्यंत पुरुषाचे लग्न करावे असे त्यांचे स्पष्ट म्हणणे होते. यावरून समाजातील बालविवाहाला त्यांचा कडकडून विरोध होता हे स्पष्ट दिसून येते. स्त्रियांच्या अवनीतीला थोपवण्याचा प्रयत्न त्यांनी आपल्या कार्यातून केला.

त्यानंतर ईश्वरचंद्र विद्यासागर यांच्या प्रयत्नातून पुनर्विवाहाचा कायदा संमत झाला आणि स्त्रियांना आपले जीवन जगण्याचा अधिकारच मिळाला अंधाऱ्या चार भिंतींच्या कोठडीतून तिची मुक्तता झाली. या सर्व विचारवंतांनी केलेल्या सामाजिक कार्यामुळे स्त्रियांची मुक्तता झाली. रुढी परंपरांच्या बंधनातून ती मुक्त झाली, अन्यायाविरुध्द लढण्याची हिंमत तिच्यामध्ये निर्माण झाली. स्त्रीचे समाजातील स्थान बळकट करून 'माणूस' म्हणून जगण्याची संधी तिला मिळाली. समाजसुधारकांनी केलेल्या कार्यामूळे बालविवाह, सतीप्रथा, केशवपन इत्यादी जाचक रुढी बंद झाल्या. पण मुलींना शिक्षणापासून वंचितच रहावे लागले. यातूनही सुटका करण्याचे महान कार्य एका महात्म्याने केले. तो म्हणजे महात्मा जोतिबा फुले. म. फुले हे लोकहितवादी, रानडे, आगरकर, टिळक इत्यादी प्रभृतींना समकालीन होते. तत्कालीन सुशिक्षितांचा 'सुधारणावाद' हा तत्वत: बराच व्यापक होता. स्त्री शिक्षण, पुनर्विवाह, प्रौढविवाह, सतीपध्दतीविरोध, बालविवाहास विरोध इत्यादी गोष्टींचा विचार प्रामुख्याने त्या काळात झाला. परंतु याही पलिकडे जाऊन ज्योतिबांनी अनेक कार्य केलीत. वर्णवर्चस्वावर त्यांनी जोरदार हल्ला केला, एकेश्वरवादी धर्मकल्पना मांडली, गुलामगिरीविषयी मनस्वी चीड त्यांच्या मनात होती. अस्पृश्यांसाठी शाळा काढली, स्त्रियांसाठी स्वतंत्र शाळा सुरु केली, अस्पृश्यांसाठी त्यांनी स्वत:च्या घरचा पाण्याचा हौद तसेच सार्वजनिक पाणवठे खुले केले, स्वत:च्या घरात बालहत्या प्रतिबंधक गृह स्थापले. स्वत: अनाथ मूल दत्तक घेतले. मजुरांच्या दु:खांना वाचा फोडण्यासाठी सभा परिषदांमधून प्रतिनिधित्व केले. इतक्या व्यापक कक्षा म. जोतिबांच्या होत्या. त्या केवळ मध्यमवर्गीय सुधारणावादापुरता मर्यादित नव्हत्या. आपल्या पत्नीला शिक्षण देऊन त्यांनी शिक्षिका बनविले व मुलींच्या शाळेत मुलींना शिकविण्यास पाठविले. समाजातील असा एकही स्तर नव्हता की त्यांचे अश्रू जोतिबांनी पुसले नाहीत. अडलेल्या नडलेल्या प्रत्येकाला त्यांनी सहाय्य केले. मुळात समता, बंधुता आणि मानवता हीच त्यांची आधार तत्वे होती आणि ती त्यांनी मनापासून रुजविली. स्त्रीने सती जायचे तर पुरूषांनी का नाही? असा खडा सवाल त्यांनी केला. अशाप्रकारे समाजात स्त्रीपुरूष समानतेचा पुरस्कार केला म्हणूनच ते 'स्त्री मुक्तीचे' प्रणेते ठरले.

ISSN :2348-7143 (Online)
July-Sept.- 2015

म. फुले यांनी सुरू केलेले शिक्षणाचे कार्य पुढे व्यापक करण्याचे कार्य महर्षी धोंडो केशव कर्वे यांनी केले. त्यांनी आपले संपूर्ण जीवन स्त्री शिक्षणासाठी व सामाजिक कार्यासाठी वेचले. त्यांनी विधवेशी पुनर्विवाह केला. ही घटना अतिशय क्रांतिकारी ठरली. समाजात स्त्रियांवर होणारा अन्याय आणि मिळणारी दुय्यम वागणूक पाहून स्त्रियांना आधी सुशिक्षित आणि स्वावलंबी बनवले पाहिजे हा विचार करून त्यांनी आपले संपूर्ण जीवन स्त्री सुधारणेसाठी वेचले. शिक्षणाबरोबरच स्त्रियांचे सामाजिक प्रश्न त्यांनी सोडविण्याचा प्रयत्न केला. त्यांच्याविषयी आचार्य अत्रे अतिशय अभिमानाने म्हणतात, ''महाराष्ट्राच्या सामाजिक इतिहासाचे ते एक महान शिल्पकार होते.''[४] हे सत्य त्यांच्या कार्यातून प्रचितीस येते.

बालविवाहासारखी अनिष्ठ प्रथा हिंदू धर्मात होती त्यामुळे समाजात विधवांची संख्या जास्त होती. पुन्हा त्यांना समाजात अत्यंत कष्टप्रद जीवन कंठावे लागत होते. स्त्रीचे असे हाल होऊ नयेत म्हणून त्यांनी १८९३ मध्ये 'विधवाविवाहोत्तेजक' मंडळाली स्थापना केली. व जनजागृतीसाठी १८५४ मध्ये पुण्यात पुनर्विवाहितांचा मेळावाही भरविला. त्याचप्रमाणे विधवांना आपले जीवन निरर्थक नसून सार्थक आहे हा आत्मविश्वास निर्माण करण्यासाठी १८९९ मध्ये पुण्यातील सदाशिव पेठेत 'अनाथ बालिकाश्रमाची' स्थापना केली. पुढे १९०० साली पुण्याजवळील हिंगणे या ठिकाणी ते स्थलांतरीत केले. त्यांनी १९०७ मध्ये 'महिला विद्यालयाची' स्थापना केली. व स्त्रियांना दैनंदिन जीवनास उपयुक्त अशा आरोग्यशास्त्र, गृहजीवनशास्त्र, शिशुसंगोपनशास्त्र याविषयांचा समावेश केला. याशिवाय १९१६ साली त्यांनी 'महिला विद्यापीठाची' स्थापना केली. आता ते श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी' महिला विद्यापीठ या नावाने ओळखले जाते. 'स्त्रीशिक्षणासाठी केलेला विचार व उच्चार हीच परमेश्वराची प्रार्थना आहे, असे ते म्हणत. आपली संपूर्ण हयात त्यांनी स्त्रीशिक्षणासाठी घालवली. त्यांच्या या विशाल कार्याची दखल घेऊन भारत सरकारने त्यांना 'भारतरत्न' या सर्वोच्च सन्मानाने सन्मानित केले. या त्यांच्या सर्व कार्यातून ते 'स्त्री-चळवळीचे प्रणेते' होते हे स्पष्ट दिसून येते.

म. फुले यांनी अस्पृश्यता निवारण्यासाठी सुरू केलेल्या प्रयत्नांना मूर्त स्वरुप देण्याचे कार्य प्रामुख्याने महार्षि विठ्ठल रामजी शिंदेंनी केले त्याचबरोबर स्त्री मुक्तीचा पुरस्कारही त्यांनी केला. त्यांनी आपल्या व्याख्यानातून लिखाणातून स्त्री स्वातंत्र्याचे महत्त्व सांगितले. एवढेच नव्हे तर मानवी जीवनात स्त्रीचे काय स्थान आहे ते अतिशय सखोल पध्दतीने त्यांनी सांगितले आहे. त्यांच्या मते, ''मानवी जगाच्या इतिहासाच्या आरंभी घरात व समाजातही स्त्रीला अधिकाराचे राज्य होते. त्या काळी स्त्रीसत्ताक पध्दती अस्तित्वात होती. त्या काळात स्त्रीजवळ आजच्याप्रमाणे असलेल्या भावनांसोबतच उपजत बुध्दी, विवेकबुध्दी व प्रयत्न सामर्थ्याचे खच्चीकरण होऊन स्त्रियांनी पुरूषांपुढे गौणत्व स्वीकारले असावे. असे असले तरी फक्त पाळण्याचीच नव्हे तर घरगुती राज्याची दोरी स्त्रीच्याच हाती आहे. स्त्रीला केवळ शिष्टाचार युक्त वागण्यात मान दिल्याने स्त्रीला समानतेने वागवले असा त्याचा अर्थ होत नाही. स्त्रीच्या विवेकी बुध्दीत म्हणजेच विचारशक्तीत वाढ घडवून सामाजिक जडणघडणीत तिला क्रियाशील बनवायचे असेल तर तिला खरेखुरे स्वातंत्र्य द्यायला हवे.''[५] असे आवर्जुन प्रतिपादन वि.रा.शिंदे करताना आढळतात. कोणत्याही कार्यात स्त्रियांना सहभागी करून घेणे महत्त्वाचे आहे. कारण तिच्या सहभागाने ते कार्य सफल होते. यावर त्यांचा विश्वास होता.

भारतीय वसतीगृहाचे आद्यजनक, मोठया दिलाचा राजा व स्त्री उध्दारक म्हणून ज्यांचा उल्लेख केला जातो ते राजर्षि शाहू महाराज यांनी म. फुल्याचे जीवितकार्य आदर्शवत मानून सत्तेचा वापर स्त्रीपुरूष समानता स्थापन करण्यासाठी घालविला. जातीव्यवस्था, वर्णभेद, शेतकऱ्यांचे प्रश्न, अस्पृश्योध्दार यासाठी त्यांनी भरीव काम केले. अंधकाराच्या गर्तेत अडकलेल्या स्त्रियांना बाहेर काढण्याचे कामही त्यांनी केले. स्त्रीपुरुष सर्वांसाठी प्राथमिक शिक्षण त्यांनी सक्तीचे व मोफत केले. सर्व जातीधर्माच्या स्त्रिया, विधवा, असहाय्य मुली व अस्पृश्यवर्गातील लोकांना क्रूरपणे वागविणाऱ्या लोकांना कडक शासन झालेच

पाहिजे असे फर्मान त्यांनी काढले. एवढेच नव्हे तर स्त्री-शिक्षणासाठी महाराजांनी, राधाबाई आक्कासाहेब महाराज स्कॉलरशीप तसेच नंदकुमार महाराणी भावनगर स्कॉलरशीप सुरु केल्या. १९०२ मध्ये अस्पृश्य व स्त्रियांसाठी नोकऱ्यांमध्ये ५० टक्के राखीव जागांची त्यांनी तरतूद केली अशी तरतूद करणारे हे पहिले संस्थापक होते. याशिवाय स्त्रियांना क्रूरपणे वागविण्यास प्रतिबंध कायदा १९१९ मध्ये त्यांनी केला. यासर्व कार्याचा आढावा घेता हे व्यक्तिमत्त्व किती महान होते हे लक्षात येते. ''महर्षी शिंदे यांनी त्यांच्याबद्दल काढलेले गौरवोद्गार 'सर्वांगपूर्ण राजपुरूष' तसेच भाई माधवराव बागल यांनी त्यांच्याबद्दल, 'He was a king but democratic king' काढलेले प्रशंसोद्गार किती सुसंगत व सार्थक आहेत, हे आपणास जाणवल्यावाचून राहत नाही.''[६] इतके धडाडीचे कार्य करणारे ते लोकनेते होते. तसेच स्त्रियांच्या उन्नतीसाठी झटणारे स्त्री सुधारकही होते.

अशाप्रकारे या सर्वच स्त्रीसुधारकांनी त्याकाळात रुढीपरंपरेच्या गर्तेत अडकलेल्या स्त्रीला आपल्या कार्याच्या आधारे माणूस म्हणून जगण्याचा अधिकार मिळवून दिला म्हणूनच ती स्वाभिमाने उभी राहू शकली. शिकली, सुशिक्षित झाली याचे सर्व श्रेय या सुधारकांना जाते. १९व्या शतकात अनेक समाजसुधारकांनी समाजातील स्त्रीची अवनिती पाहून तिला मुक्त करण्यासाठी प्रामुख्याने तिला तिचे हक्क मिळवून देण्यासाठी अतोनात प्रयत्न केले. बाळशास्त्री जांभेकरांनी आपल्या 'दर्पण', लोकहितवादींनी 'शतपत्रे' तर गोपाळ गणेश आगरकरांनी 'सुधारक' या वर्तमानपत्रातून आवाज उठविला. राजाराम मोहन रॉय, न्या. महादेव गोविंद रानडे, स्वामी दयानंद सरस्वती, ईश्वरचंद्र विद्यासागर, महात्मा जोतिबा फुले, महर्षि धोंडो केशव कर्वे, महर्षि विठ्ठल रामजी शिंदे, राजर्षि शाहू महाराज इत्यादी सुधारकांनी आपल्या कार्यातून व कृतीतून स्त्रियांवर होत असलेल्या अन्यायाविरूध्द लढा दिला व तिला तिला आपले हक्क मिळवून दिले. यात सिंहाचा वाटा ज्योतिबा फुलेंचा आहे. कारण जोपर्यंत स्त्री शिकत नाही तोपर्यंत ती आपल्या पायावर उभी राहू शकत नाही. हे त्यांनी जाणले व आपल्या पत्नीसह स्त्रियांना शिक्षण देण्याचे महान कार्य केले. स्त्री शिकली तिने आपल्या कर्तृत्वाने आपले मानाचे स्थान मिळवले. स्त्री सुधारकांनी समाजातील अनिष्ठ रुढी परंपरेविरूध्द दिलेल्या लढ्यामुळेच हे साध्य झाले यात काहीही शंका नाही.

**संदर्भ -**


१. प्रा. नरेद्र मारवाडे - आधुनिक मराठी वाङ्मयाची सांस्कृतिक पार्श्वभूमी, कैलाश प्रकाशन, औरंगाबाद, प्रथमावृत्ती २००५ पृ. क्र. ६३.
२. संपादक : डॉ. हे. वि. इनामदार, डॉ. मो. स. गोसावी. आधुनिक भारतीय तत्त्वज्ञ गोखले एज्युकेशन सोसायटी, नाशिक ०५, प्रथमावृत्ती १९ फेब्रुवारी १९९० पृ. क्र. ४८.
३. गंगाधर महाम्बरे, सुरेश रा. ढमाळ - महाराष्ट्रातील समाजसुधारक, पद्मगंधा प्रकाशन, पुणे-३८, प्रथमावृत्ती जाने. २०००, पृ. क्र. ५७
४. कित्ता पृ. क्र. ६७.
५. Net वरून - Mr.Wikipedia.org/wiki /L=hokn i-dz-02
६. गंगाधर महाम्बरे, सुरेश रा. ढमाळ - महाराष्ट्रातील समाजसुधारक, पद्मगंधा प्रकाशन, पुणे-३८, प्रथमावृत्ती जाने. २०००, पृ. क्र. ९७.